जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAY 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १४ रोजी आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवार, दि. १४ रोजी दुपारी ४ वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'सत्यशोधक आण्णासाहेब लठ्ठे' या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. शाहू महाराज प्रमुख उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन शांतीनाथ कांते यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

11 MAY 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रामीणमध्ये सेंद्रिय शेती नवी अर्थव्यवस्था

## डॉ. पी. एस. पाटील : इको स्वास्थ्यतर्फे सेंद्रिय उत्पादन प्रदर्शन

■ सकाळ वृत्तसेवा

शाहू नाका, ता. १० : 'सेंद्रिय व नैसर्गिक शेती केवळ आरोग्यास पोषक नाही, तर ग्रामीण भागात नवीन अर्थव्यवस्थाही निर्माण होऊ शकते,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. इको स्वास्थ्य आयोजित सेंद्रिय उत्पादनांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्र-कुलगुरू पाटील म्हणाले, ''सध्याच्या काळात वाढते प्रदूषण, रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर यामुळे माणसाचे आरोग्य धोक्यात आले आहे. सेंद्रिय शेतीत रासायनिक पदार्थांचा वापर टाळून नैसर्गिक खते व कीटकनाशकांचा उपयोग केला जातो. परिणामी, मातीची सुपीकता टिकते, पर्यावरणावर परिणाम होत नाही आणि अन्न सुरक्षित बनते. शेती पद्धत केवळ मानवासाठीच नव्हे, तर जैवविविधतेसाठीही हितकारक आहे.''



शाहू नाका : प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. डावीकडून शरद आजगेकर, दिलीप माळी, उन्मेष साठे, सुधीर हंजे आदी.

सुधीर हंजे म्हणाले, ''नैसर्गिक व सेंद्रिय पध्दतीने पिकविलेला भाजीपाला शेतकऱ्यांच्या माध्यमातून इतरांनाही मिळावा, या उद्देशाने केंद्र सुरू केले.' इको स्वास्थ्यतर्फे शांतिनिकेतन स्कूलसमोर भरविलेल्या प्रदर्शनात २५ हून अधिक स्टॉल्समधून सेंद्रिय फळे, भाजीपाला, धान्ये आणि अन्य नैसर्गिक उत्पादने उपलब्ध आहेत. दरम्यान, 'प्लास्टिकला नकार, वसुंधरेला होकार' या संकल्पनेवर आधारित मुलांच्या चित्रकला स्पर्धाही झाली. विजेत्यांचा सत्कार डॉ. पाटील यांच्याहस्ते झाला. रविवारी (ता. ११) सायंकाळी आठपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आव्हान संयोजकांनी केले. शरद आजगेकर यांनी सूत्रसंचालन, तर आसावरी हंजे यांनी आभार मानले. यावेळी दिलीप माळी, सुधीर हंजे, डॉ. तृप्ती करेकट्ट, वसीम सरकावस, उन्मेष साठे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 MAY 2025
पुढारी,

# पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्ष सत्रापासून ६०/४० पॅटर्न लागू

- विद्यापीठ अधिकार मंडळाची मान्यता
- आगामी शैक्षणिक सत्रापासून अंमलबजावणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी, पदव्युत्तर प्रथम वर्षापासून ६०/४० पॅटर्न लागू करण्यात येणार आहे. याला विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. याबाबतचे परिपत्रक उपकुलसचिव डॉ. एस.एम.कुबल यांनी गुरुवारी काढले आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये सातत्यपूर्ण मूल्यमापन ही योजना आखण्यात आली आहे. त्यामध्ये कौशल्यावर आधारित शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. राज्याच्या नवीन शैक्षणिक धोरण सुकाणू समितीने ६०/४० आग्रह धरला होता. राज्यातील बहुतांश विद्यापीठांनी हा पॅटर्न राबविण्यास सुरुवात केली आहे.

त्याप्रमाणेच शिवाजी विद्यापीठ हा पॅटर्न राबविणार आहे. नुकत्याच झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत या पॅटर्नला मान्यता देण्यात आली आहे.

याचाच भाग म्हणून ६०/४० हा पॅटर्न येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासून हा पॅटर्न लागू करण्यात येणार आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही ६०/४० पॅटर्न नुसार घेण्यात येणार आहे. परंतु त्यांच्या गुणांचे रूपांतर ७०/३० मध्ये करण्यात येणार आहे. यापूर्वी ८०/२० पद्धत राबविली जात होती.

नवीन पॅटर्न राबविण्यासाठी विद्यापीठाकडून तयारी सुरू झाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती वाढेल. उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित होते. भविष्यकाळात विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून